# यशोधाम पब्लिक स्कूल & ज्युनिअर कॉलेज

A Permanent Non-Granted, Non-Aided, Jain Minority Institution
Affiliated to CBSE (New Delhi) No. : 1130387
MALKAPUR, Dist. Buldana Tel. : 226566 (Principal Off.), 226285 (Admin. Off.)
E-mail : ypsmalkapur@gmail.com website : www.ypsmalkapur.in

दि. १४.०७.२०२५

## प्रिय पालक-इयत्ता ५ वी ते१० वी

आपणास सुचित करण्यात येते की, या आधी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये दिनांक १४.०६.२०२४ , २०.०६.२०२४ व १३.०२.२०२५ तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये २६.०३.२०२५ ला स्कूल मार्फत विद्यार्थ्यांच्या शिस्ती बाबत परिपत्रक काढण्यात आलेले आहे. आपणास विद्यार्थ्यांन कडुन शालेय शिस्तीचे पालन होणे अपेक्षित आहे, जेव्हा शाळेकडुन विद्यार्थ्यांस चांगल्या सवयी (स्वच्छता, वेळेचे बंधन, सत्यता, जेष्ठांचा आदर ई.) लागाव्या म्हणुन या बाबतीत आवश्यक सूचना दिल्या जातात तेव्हा पालकांनी आपल्या पाल्याकडुन शिस्तीचे पालन होण्याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. जेव्हा शाळेच्या प्राचार्यांना विद्यार्थ्यांच्या शिस्ती बाबत काही अनियमितता वाटेल तेव्हा शाळेचे प्राचार्य म्हणुन ते योग्य ती सूचना, आदेश, निर्णय देउ शकतात ते विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी आवश्यक व बंधनकारक असतील.

**स्कूल मध्ये मोबाईल/इलेक्ट्रानिक गॅजेट्स बाबत**

- आपणास निदर्शनास आणुन देण्यात येत आहे की, शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांच्या स्कूल बॅगची तपासणी करण्यात येत आहे, स्कूल मध्ये, स्कूल बस मध्ये कोणत्याही विद्यार्थ्याकडे **मोबाईल/इलेक्ट्रानिक** गॅजेट्स **पैसे व इतर मौल्यवान वस्तु** आढळुन आल्यास त्या स्कूल मार्फत जमा करुन घेतल्या जातील व परत दिल्या जाणार नाही (चुकीने बॅग मध्ये आले असले तरी) पालकांनी आपल्या पाल्याच्या बॅग मध्ये अशा प्रकारच्या वस्तु नाहीत याची खात्री करुन घ्यावी. पालकांनी आपल्या पाल्यांना कोणत्याही प्रकारचे मोबाईल, टॅब, डीजीटल वॉच व इतर कोणतेही इलेक्ट्रानिक संसाधने देवु नये, कोणत्याही विद्यार्थ्यांन कडे सदर **मोबाईल/इलेक्ट्रानिक** गॅजेट्स **पैसे व इतर मौल्यवान वस्तु** आढळुन आल्यास सदर विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
- शाळेच्या परिसरात, वर्गात गैरवर्तन करतांना, अपशब्द वापरतांना, स्कूलच्या संपत्तीचे नुकसान करतांना पकडले गेल्यास स्कूलच्या नियमा प्रमाणे आपल्या पाल्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल तसेच केलेल्या नुकसानाची भरपाई करुन घेतल्या जाईल व आपल्या पाल्यास ३ ते ८ दिवसांकरीता निलंबीत केले जाईल किंवा आपल्या पाल्यास शिस्तभंग केल्याच्या शेरा टाकुन टी. सी. देण्यात येईल.
- सर्व विद्यार्थ्यांनी स्कूल बस मध्ये शिस्त पाळणे आणि बस मधील कंडक्टर/कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करणे अपेक्षित आहे, जर कोणताही विद्यार्थी स्कूल बस मध्ये गैरवर्तन, स्कूल बस चे नुकसान करतांना आढळल्यास अशा विद्यार्थ्यांवर शिस्त भंगाची कारवाई करण्यात येईल तसेच केलेल्या नुकसानाची भरपाई करुन घेतल्या जाईल व आपल्या पाल्यास पुढे स्कूल बस वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही.
- आपल्या पाल्या मार्फत इतर विद्यार्थ्यांना काही दुखापत झाल्यास असे कृत्य दंडनीय राहील.
- वर्गात शिक्षक शिकवत असतांना एखादा विद्यार्थी नेहमी पुर्ण क्लासला व्यत्यय आणत असेल तर ईतर विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही या करीता सदर विद्यार्थ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
- जे विद्यार्थी सतत गैरहजर राहत असतील अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी स्कूल ऑफीस मध्ये भेटावे.
- जे विद्यार्थी अभ्यासात खुपच कमजोर आहेत अशा विद्यार्थ्यांचे पालकांना शिक्षकांमार्फत सुचना दिल्या जातील अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी स्कूल ऑफीस मध्ये भेटावे.
- शाळेत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेतल्या कोणत्याही कर्मचाऱ्याशी गैरवर्तवणूक करु नये, आपले म्हणणे शाळेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या तक्रार पुस्तिकेत लेखी स्वरुपात नोंदवावे, कोणत्याही पालकाने शालेय परिसरात कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन शाळेच्या कोणत्याही कर्मचाऱ्या सोबत केले तर सदरील विद्यार्थ्यांचा प्रवेश शाळेतुन तात्काळ रद्द करण्यात येईल. याची सर्व पालकांनी नोंद घ्यावी. धन्यवाद

YASHODHAM PUBLIC SCHOOL MALKAPUR

Principal
Yashodham Public School
MALKAPUR

VAIBHAV B MAHAJAN
Digitally signed by VAIBHAV BANSISA MAHAJAN
Date: 2025.07.14 20:32:19 +05'30'

डॉ. व्ही. बी. महाजन
व्यवस्थापक
यशोधाम पब्लिक स्कूल अ‍ॅ. ज्यु. कॉलेज मलकापुर

Manager
Yashodham Public School
Malkapur Dist Buldana (M.S